# www.arthritis-india.com

## निवडक रुग्ण कथा

डॉ. श्रीकान्त वाघ, ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट, पुणे

**Coping with Rheumatoid Arthritis**
(Marathi)



### माझा संधिवात नक्की बरा होणार-

### सौ. कल्याणी टिळक (पुणे) +९१ ०९३७३३४४८३

'संधिवात' तुमच्या प्रगतीची गती कमी करणारा, आयुष्य उद्‌ध्वस्त करणारा आजार- मला संधिवात असल्याचे जेव्हा पहिल्यांदा निदान झाले तेव्हा मला असंच वाटलं होतं. पण आता असे वाटत नाही. त्याचे झाले असे....

२००५चा मे महिना- माझी पावले दुखत होती म्हणून ऑर्थोपेडिक सर्जनकडे दाखवायला गेले. डॉक्टरांनी चपला बदलण्याचा सल्ला दिला. त्यानंतर काही दिवसांनी आम्ही कुटुंबातील सर्वजण वैष्णवदेवी आणि काश्मीर सहलीला गेलो. सहलीत मला थंडीचा खूपच त्रास झाला आणि पुण्यात येईपर्यंत माझे सर्व अंग जखडून गेले. कुठला ही अवयव हलवताना असह्य वेदना होऊ लागल्या.

वयाच्या ३२व्या वर्षी ऑर्थोपेडिक डॉक्टरांनी निदान केले की संधिवात आहे व किमान ३-४ वर्षे औषध घ्यावे लागेल. यामध्ये स्टिरॉईड्सचा पण समावेश असेल.

स्टिरॉईड्स- या शब्दाची भीती व त्याचा साईड-इफेक्टची काळजी, आजूबाजूच्या लोकांचे सल्ले आणि अनुभव यांमुळे ॲलोपॅथीकडे पाठ फिरवली व आयुर्वेदाचा आधार घेतला. अवस्था गंभीरच होती. प्रत्येक हालचालीसाठी कोणाची तरी मदत लागत होती. कधी-कधी तर स्वत:चे स्वत: कुशीवर वळणेदेखील जमत नव्हते. वेणी घालणे, खुर्चीवरून उठणे, साडी नेसणे, कपडे घालणे, आंघोळ करणे आणि अगदी जेवणेसुद्धा दुसऱ्याकडून करून घ्यावे लागत होते.

साहजिकच या सगळ्याचा परिणाम कुटुंबातील सर्वांवर झाला. सर्व घरकामांसाठी बाई ठेवावी लागली. सुदैवाने माझ्या पतींच्या नोकरीचे स्वरूप घरी बसून काम करण्यासारखे असल्याने वरील अनेक कामे त्यांच्या मदतीने करता आली. मुलाला बागेत नेणे, खेळायला नेणे, फिरायला जाणे इ. शक्य होत नसे. पण त्यानेही समजूतदारपणा दाखविला.

गेली ४-५ वर्षे विविध उपचार व उपचारपद्धती करून झाल्या. आयुर्वेद, होमिओपॅथी, योग, व्यायाम, पथ्य, मसाज, प्राणायाम इत्यादी अनेक उपाय झाले. या सर्वांचा उपयोग होत होता पण आजार पूर्ण बरा होण्याची चिन्हे दिसत नव्हती. शेवटी एका इंग्रजी वर्तमानपत्रातली माहिती वाचून दोन्ही कोपरांवर ५-६ डागही देऊन घेतले.

'भोग संपल्याशिवाय वैद्य भेटत नाही.' तसे २००८मध्ये डॉ.श्रीकांत वाघ यांच्याकडे जाण्याचा योग आला. ज्या ॲलोपॅथीकडे स्टिरॉईड्सच्या भीतीमुळे पाठ फिरवली होती त्याकडे घाबरतच सावधपणे पाऊले वळली. ऱ्हुमॅटॉलॉजिस्ट म्हणजे संधिवाताचे तज्ज्ञ. एवढीच माहिती तेव्हा होती. डॉक्टरांनी उपचाराबद्दल आणि स्टिरॉईड्सबद्दल संपूर्ण माहिती दिली. आमच्या सर्व शंकांचे निरसन केले, गैरसमज व भीती दूर केली. खूप आधार वाटला.

डॉ.श्रीकांत वाघ यांचे उपचार सुरू करून आता ९-१० महिने झालेत. माझ्यातली सुधारणा आश्चर्यकारक आहे. पेनकिलर न घेता मला कुठल्याही वेदना नाहीत. पूर्वीसारखीच मी आता स्कूटरवरून गावात कुठेही एकटी फिरू शकते. आत्मविश्वास एवढा वाढला आहे की मी स्वयंपाकाच्या बाईला काढून टाकले आणि पोळ्यांपासून सर्व स्वयंपाक स्वत: करते.

डॉ.श्रीकांत वाघ या व्यक्तीविषयी खूप कुतूहल निर्माण झालं. याचं कारण एका बाजूला आयुर्वेदात हा संधिवात बरा करण्यासाठी औषध नाही (दुसऱ्या पॅथीबद्दल बहुतेक सर्वच डॉक्टर फारसे चांगले बोलत नाहीत.) असे म्हणणारे डॉ. वाघ तपासताना नाडीपरीक्षाही करतात. त्यांच्याविषयी अधिक माहिती ऐकून व वाचून त्यांचे आश्चर्यकारक अष्टपैलू व्यक्तिमत्व लक्षात आले. ते आयुर्वेदातील एम.डी. आहेत. आयुर्वेदात संशोधनाचे कार्य करत आहेत. आयुर्वेदाबद्दलचे त्यांचे उद्‌गार हे केवळ 'दुसरी पॅथी' म्हणून नसून त्यांचा तो अभ्यासपूर्ण अधिकार आहे.मला डॉक्टरांचे उपचार घेण्यास उशीरच झाला त्यामुळे एक गुडघा थोडा झिजला आहे. तुम्हाला असा उशीर होऊ नये म्हणून हा लेखप्रपंच वेळेवर उपचार घ्या व लवकर ठणठणीत बरे व्हा.